शासन ज्ञापन, क्रमांक- एलआरएफ-२६०४/९२/प्र.क्र. १७४८/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक ८ मे, २००८

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
दिनांक-14 MAY 2008
आवक क्र :- 11485
संकलन :-
विशेष नि.उ.जि. जिल्हाधिकारी

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
मौजे बांद्रा, ता. अंधेरी, स. नं. ३४१, नभूक्र ६२९ पै, "एफ" ब्लॉक मधील भूखंड क्रमांक ५ मधील "स्टेडीयम" व "मोकळी जागा" या आरक्षणाखालील एकूण जमिनीपैकी १ हेक्टर (१०,००० चौ. मी.) क्षेत्र कासेगांव एज्यूकेशन सोसायटी या संस्थेस अतिमरित्या मंजूर करण्याबाबत...

**पहा :-** शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक- एलआरएफ-२६०४/९२/प्र.क्र. १७४८/ज-३, दिनांक २७/११/२००६

**शासन ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक- ११/३ अ/एफ-२७७, दिनांक २/११/२००७ व विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांचे पत्र क्रमांक मशा/कार्या-२/जमीन-३/कावि-३२१/२००४, दिनांक २५/११/२००७ ला अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मौजे बांद्रा, ता. अंधेरी, स. नं. ३४१, नभूक्र ६२९ पै, "एफ" ब्लॉक मधील भूखंड क्रमांक ५ मधील "स्टेडीयम" व "मोकळी जागा" या आरक्षणाखालील एकूण जमिनीपैकी १ हेक्टर (१०,००० चौ. मी.) जमीन कासेगांव एज्यूकेशन सोसायटी या संस्थेस मंजूर करण्याबाबत दिनांक २७/११/२००६ च्या शासन पत्रान्वये हेतूपत्र देण्यात आले होते. त्यानंतर प्रस्तुत जमिनीचे "संस्थात्मक वापर" (Institutional purpose) असे आरक्षण करण्याबाबत नगर विकास विभागाने दिनांक १५/१/२००८ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर जमीन, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम, १९७१ मधील नियम ५ व ६ आणि शासन परिपत्रक दिनांक ८/२/१९८३ मधील परिच्छेद १० व १२ मधील अटी/शर्तीवर तसेच शासन निर्णय, दिनांक ११/५/१९८४ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीच्या सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यानिर्धारण विभाग यांचेकडून निर्धारित करण्यात येणा-या दिनांक १/२/१९७६ रोजीच्या मुल्याच्या २५% इतकी रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून वसूल करुन नेहमीच्या अटी/शर्तीवर तसेच खालील विशिष्ट अटी/शर्तीवर, इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यास, सदर भूखंड अंतिमरित्या मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**अटी :-** १) सदर जमीन भोगवटादार वर्ग - २ म्हणून मंजूर करण्यात येत असून शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय वापरात बदल/हस्तांतरण करता येणार नाही.

२) संस्थेस जमीन ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे, त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३) सदर जमिनीलगत असलेल्या वाकोला नाला रुंदीकरण प्रस्तावाबाबत प्रकल्प संचालक व सदस्य सचिव, मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण यांचेकडून घालण्यात येणा-या अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

४) शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचे तथा अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

५) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून घालण्यात येणा-या इतर अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

२. सदरचे आदेश नगर विकास विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १६२/०८/व्यय-९, दिनांक १६९/०८/व्यय-९, दिनांक २/४/२००८ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि. सि. वखारे)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा.
५) महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
७) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
८) नगर विकास विभाग, नवि-११, मंत्रालय, मुंबई.
९) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग/माशि-३, मंत्रालय. मुंबई.
१०) सह सचिव, कासेगांव एज्यूकेशन सोसायटी, कासेगांव, ता. वाळवा, जिल्हा सांगली.
११) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

C:\VILAS DHADE\G R/101

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com

4HS-A

क्रमांक : ११/३ अ/एफ-२७७
दिनांक : ०२/०६/२००८

**वाचले :** १) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एलआरएफ-२६०४/९२/प्र.क्र. १७४/ज-३ दि. ८ मे ०८
२) या कार्यालयीन पत्र समक्रमांक दि. ३०/५/०८.
३) संस्थेचे पत्र दि. ३१/५/०८

**आदेश :**

मौजे बांद्रा, ता. अंधेरी येथील स.नं. ३४१, न.भू.क्र. ६२९ पै. 'एफ' ब्लॉकमधील भूखंड क्र. ५ मधील "स्टेडीयम" व "मोकळी जागा" या आरक्षणाखालील एकूण जमिनीपैकी १ हेक्टर (१०,००० चौ.मी.) जमिनीचे "संस्थात्मक वापर" (Institutional Purpose) असे आरक्षण करण्याबाबत नगर विकास विभागाने दि. १५/०१/२००८ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर जमिन, महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ५ व ६ आणि शासन, परिपत्रक दि. ०८/०२/१९८३ मधील परिच्छेद १० व १२ मधील अटी/ शर्तीवर तसेच शासन निर्णय दि. ११/०५/१९८४ मधील तरतूदीनुसार सदर जमीनीच्या सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग यांचेकडून निर्धारीत करण्यात येणाऱ्या दिनांक १/२/७६ रोजीच्या मुल्याच्या २५ टक्के इतकी रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून वसूल करुन नेहमीच्या अटी/ शर्तीवर तसेच काही विशिष्ट अटी/शर्तीवर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यास कासेगांव एज्युकेशन सोसायटी या संस्थेस मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

प्रस्तुत जमीनीची दिनांक १ फेब्रुवारी १९७६ च्या बाजारभावाप्रमाणे किंमत रु. ९००/- प्रती चौ. मी. या दराने होणारी सवलतीची कब्जेहक्काची रक्कम रु. २२,५०,०००/- या कार्यालयात भरणा करणेस संस्थेस कळविण्यात आले होते. तसेच जमीनीची सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग यांचेकडून निर्धारीत केल्यानुसार येणारी अंतिम सवलतीची कब्जेहक्काची रक्कम व तात्पुरती किंमत यामधील फरकाची रक्कम शासनाने विहित केलेल्या व्याजासह भरणा करणेस तयार असलेबाबत आणि उपरोक्त दिनांक ८ मे २००८ च्या ज्ञापनातील अटी क्रमांक १ ते ५ संस्थेस मान्य व संस्थेवर बंधनकारक राहतील अशा आशयाचे हमीपत्र रु. १००/- च्या मुद्रांक शुल्क कागदावर करुन सादर करणेस संस्थेस कळविणेत आले होते.

संस्थेने त्यांचे दिनांक ३१/५/२००८ च्या पत्रान्वये बँक ऑफ बडोदा अंधेरी शाखेकडील डिमांड ड्राफ्ट क्र. ३७५६२७ दिनांक ३१/५/२००८ व्दारा सवलतीची कब्जेहक्काची रक्कम भरणा केली आहे. तसेच तात्पुरती सवलतीची कब्जेहक्काची किंमत व अंतिम सवलतीची कब्जेहक्काची किंमत यातील फरकाची रक्कम व्याजासह भरणेस तयार असलेबाबत व संस्थेस घातलेल्या अटी क्रमांक १ ते ५ संस्थेस मान्य व संस्थेवर बंधनकारक राहतील, असे हमीपत्र रुपये १०० /- च्या मुद्रांक शुल्क कागदावर सादर केले आहे.

त्याअर्थी मौजे बांद्रा, ता. अंधेरी येथील स.नं. ३४१, न.भू.क्र. ६२१ पै. 'एफ' ब्लॉकमधील भूखंड क्र. ५ मधील "संस्थात्मक वापर" (Institutional Purpose) असे आरक्षणा खालील १ हेक्टर ( १० ००० चौ मी. )जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जगीनीचे वितरण ) नियम १९७१ मधील नियम ५ व ६ शासन, परिपत्रक दि. ०८/०२/१९८३ मधील परिच्छेद १० व १२ मधील अटी/ शर्तीवर तसेच शासन निर्णय दि. ११/०५/१९८४ मधील तरतूदीनुसार खालील विशिष्ट अटी/ शर्तीवर प्रदान करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**अटी :-**

१. सदर जमिन भोगवटदार वर्ग-२ म्हणून मंजूर करण्यात येत असून शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय वापरात बदल/ हस्तांतरण करता येणार नाही.

२. संस्थेस जमिन ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे. त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. सदर जमिनीलगत असलेल्या वाकोला नाला रुंदीकरण प्रस्तावाबाबत प्रकल्प संचालक व सदस्य सचिव, मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण यांचेकडून घालण्यात येणाऱ्या अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

४. शासनाचे शालेय शिक्षण विभागाचे अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

५. प्रस्तुन जमिनीची तात्पुरती सवलतीची किंमत व सहा. संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग यांचेकडून निर्धारीत केल्यानुसार येणारी अंतिम सवलतीची कब्जेहक्काची किंमत व यामधील फरकाची रक्कम शासनाने विहीत केलेल्या व्याजासह भरणा करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

(सही)
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

**खाली सहीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे.**

प्रति,
सहसचिव,
कासेगाव एज्युकेशन सोसायटी,
कासेगाव, ता. वाळवा,
जिल्हा सांगली

प्रतिलिपी :

१) मा. अपर मुख्य सचिव ( महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, पुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई ४००६१४ यांचेकडे माहितीसाठी सादर.

३) तहसिलदार अंधरी, यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

४) नगर भूमापन अधिकारी बांद्रा

२/- प्रस्तुत जमीनीचा ताबा संस्थेस देऊन ताबेपावती, सुधारीत मिळकत पत्रिका व नकाशासह पुर्तता अहवाल सादर करावा.

(सही)
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

**खाली सहीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे.**



3f-ws-f277-2-kvb

C/VILAS DHADE/G R/101